महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ 17 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 233 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# बदलापुरात निनादणार शिव छत्रपतींचा जयघोष

## उल्हासनदी काठावर शिवरायांच्या अश्वारुढ पुतळ्याचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार अनावरण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर** : उल्हासनदी काठावर शिवरायांच्या अश्वारूढ पुतळयाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार अनावरण बदलापूरः छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या बदलापूर शहरारात शिवकालीन इतिहासाच्या स्मृति जपण्याचे प्रयत्न होत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून बदलापूर गावाच्या प्रवेशद्वाराजवळ छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५ फूट उंच अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला आहे. मंगळवारी (ता.१८) राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या पुतळयाचे अनावरण होणार आहे. गेल्या आठवड्याभरापासून छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळयाच्या अनावरण सोहळयाची जय्यत तयारी सुरू आहे. बुधवारी साताऱ्याहून रस्ते मार्गे हा पुतळा बदलापुरात आणण्यात आला. त्यावेळी नगर परिषदेच्या दुबे रुग्णालयापासून उल्हासनदी पर्यंत या पुतळयाची थाटामाटात मिरवणूक काढण्यात आली.आमदार किसन कथोरे, माजी नगराध्यक्ष राजेंद्र घोरपडे, भाजपा शहराध्यक्ष शरद तेली, संजय भोईर आदींसह भाजपाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते पारंपरिक मराठमोळ्या वेशभूषेत मोठ्या उत्साहाने या मिरवणुकीत सहभागी झाले होते. फटाक्यांच्या आतषबाजीत वाद्याच्या गजरात आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषात निघालेली ही मिरवणूक लक्षवेधी ठरली होती. उल्हासनदी काठावर बदलापूर गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर उभारण्यात आलेल्या चबुतऱ्यावर शिवरायांचा अश्वारुढ पुतळा उभारण्यात आला आहे. या पुतळयाचे मंगळवारी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण केले जाणार आहे. त्यानंतर रोजरी स्कूलच्या मैदानात मुख्यमंत्र्यांची जाहीर सभा होणार असल्याची आमदार किसन कथोरे यांनी दिली आहे.बॉक्सः मुख्यमंत्र्यांचा लाडक्या बहिणींच्या हस्ते सत्कार बदलापूरकरांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा लाडक्या बहिणींच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात येणार आहे. या लाडक्या बहिणींमध्ये दोन आदिवासी, दोन बंजारा, दोन गुजराती, दोन उत्तर भारतीय, दोन मराठी अशा विविध समाजाच्या महिलांचा समावेश असेल, अशी माहिती माजी नगराध्यक्ष राजेंद्र घोरपडे यांनी दिली. बॉक्सः मुख्यमंत्री काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष बदलापुरात उल्हासनदी पूर नियंत्रण रेषेमुळे शेकडो एकर जमीन बाधित झाली असून त्यामुळे जमीन बाधित झालेल्या शेतकऱ्यांना व भुखंड धारकांना दिलासा देण्यासाठी तोडगा काढावा, अशी मागणी सातत्याने होत आहे, शिवरायांच्या अश्वारूढ पुतळयाच्या अनावरण सोहळयानिमित्त बदलापुरात येत असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या पूर नियंत्रण रेषेबाबत काही तोडगा जाहीर करतील का? तसेच लांबणीवर पडलेल्या पालिका निवडणुकीबाबत वा संभाव्य महानगर पालिकेबाबत काही संकेत देतील का? याचीही उत्सुकता बदलापूरकरांना आहे. बॉक्सः बदलापूर ही छत्रपती शिवाजी महाराज व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आहे. बदलापुरात छत्रपती शिवाजी महाराज घोडे बदलत असत, हा इतिहास असून महाराजांचे महाराष्ट्रातील एकमेव मंदिर बदलापुरात आहे. गेल्या शंभरहून अधिक वर्षांपासून बदलापुरात शिवजयंती उत्सव साजरा होत असून या जयंती उत्सवाचे अध्यक्षस्थान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भूषविले होते. आमदार किसन कथोरे यांच्या संकल्पनेतून बदलापुरात इतिहासाच्या या स्मृती जपण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून उल्हास नदी जवळ छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला आहे. उल्हासनदी ते बदलापूर गावातील छत्रपती शिवाजी महाराज मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याला शिवकालीन लूक देण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यासाठी रस्त्याच्या कडेला दगडी बुरुज, कमानी, दीपस्तंभ आदी सुशोभीकरण सुरू आहे. बदलापूर गावातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिराचाही जिर्णोद्धार करण्यात येणार आहे.

# ठाणे महापालिकेला न्यायालयाने ठोठावला दंड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे: अनधिकृत बांधकामाबाबत प्रतिज्ञापत्र सादर करण्यास विलंब करणाऱ्या ठाणे महापालिकेला मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. गडकरी यांनी ५० हजारांचा दंड ठोठावल्याने महापालिकेत एकच खळबळ उडाली आहे. घोडबंदर मार्गांवरील बोरिवडे येथिल एका भूखंडावरून दोन संस्थांमध्ये मागिल अनेक वर्षांपासून वाद सुरु आहे. एका संस्थेने त्यांच्या भूखंडावर अनधिकृत बांधकाम सुरु असून ते बांधकाम निष्कासित करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात दावा दाखल केला होता. त्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे न्यायालयाने आदेश दिले होते, परंतु प्रतिज्ञापत्र सादर करण्यासाठी विलंब लावणाऱ्या ठाणे महापालिकेला ५० हजारांचा दंड ठोठावण्यात आला आहे. ठाणे महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत न्यायालय गंभीर दखल घेत असल्याने अनेकजण अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याच्या मागणीसाठी न्यायालयात धाव घेत आहेत. न्यायमूर्ती श्री. गडकरी यांनी मागिल आठवड्यात दिवा, मुंब्रा या भागातील ५२ अनधिकृत इमारतींच्या विरोधात कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यापैकी दोन इमारतींना स्थगिती देण्यात आली आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या या कणखर भूमिकेमुळे महापालिकेचे अधिकारी सतर्क झाले असून अनधिकृत बांधकामविरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार असल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले.

# तलाठी संपाचा सर्वसामान्यांना फटका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे जिल्ह्यातील तलाठी संघटनेने उत्पन्न दाखला देण्याचे काम बंद केले आहे. तसेच उत्पन्न दाखल्यामध्ये दिलेली माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास तलाठीऐवजी संबंधित अर्जदारावर कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी त्यांनी आंदोलन केले आहे. या समस्येवर अजूनही तोडगा निघालेला नसल्यामुळे गेल्या वीस दिवसांपासून नागरिकांचे हाल होत आहे. ठाणे, कल्याण, मुरबाड, उल्हासनगर, अंबरनाथ, भिवंडी आणि शहापूर असे एकूण सात तालुके ठाणे जिल्ह्यात येतात. प्रत्येक तालुक्यात दररोज ५० ते ६० उत्पन्न दाखल्यांसाठी अर्ज येतात. अर्ज करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना आवश्यक दाखले वेळेत मिळत नसल्याने त्यांची महत्त्वाची कामे खोळंबली आहेत. शासनाच्या विविध योजना, शैक्षणिक प्रवेश, तसेच शिष्यवृत्ती मिळवण्यासाठी उत्पन्न दाखल्यांची गरज असते. मात्र तलाठ्यांच्या कामबंद निर्णयामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तलाठींच्या अहवालानुसार दाखला देण्यात येत असल्याचा उल्लेख उत्पन्नाच्या दाखल्यावर केला जातो. यामुळे दाखल्यात खोटी माहिती आढळल्यास तलाठींवर कारवाई होते. या कारवाईच्या भीतीमुळे तलाठींनी उत्पन्न दाखल्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या तपासणीचे काम २३ जानेवारीपासून बंद केले आहे. त्यामुळे नागरिकांना कार्यालयात खेटे घालूनही दाखले मिळत नसल्याचे चित्र आहे. स्पर्धा परीक्षांसाठी मार्च महिनाअखेरपर्यंत अर्जासोबत उत्पन्नाचे दाखले जोडावे लागतात. या दाखल्यांसाठी तहसील कार्यालयात अर्ज केल्यानंतर १५ दिवसांनी दाखला देण्यात येतो; परंतु उत्पन्न दाखला मिळत नसल्यामुळे परीक्षेसाठी अर्ज भरायचा कसा, असा प्रश्न उपस्थित करत विद्यार्थ्यांमधून संताप व्यक्त होत आहे.



## वाचक मनोगत

### स्वर शिलेदार
### पं. प्रभाकर कारेकर

उत्कृष्ट शास्त्रीय संगीत गायक, शास्त्रीय संगीताबरोबरच फ्युजन संगीतातही वैशिष्ट्यपूर्ण काम, उत्कृष्ट शिक्षक अशी बहुआयामी प्रतिभा लाभलेले पंडित प्रभाकर कारेकर गेली दोन वर्ष यकृताच्या आजाराने ग्रस्त होते. अखेर बुधवारी रात्री त्यांची प्राणज्योत मालवली. १९४४ मध्ये गोव्यात म्हापसा येथील दैवज्ञ कुटुंबात पंडित प्रभाकर कारेकर यांचा जन्म झाला. संगीताचा पिढीजात वारसा कारेकर यांना लाभला नव्हता, मात्र त्यांचे वडील जनार्दन कारेकर यांना संगीताची आवड होती. दर गुरवारी त्यांच्या घरी भजनाचा कार्यक्रम होत असे, ज्यात प्रभाकर कारेकरही सहभागी होत असत. एकदा शाळेच्या स्नेहसंमेलनासाठी त्यांनी पं. सुरेश हळदणकर यांनी गायलेली दोन नाट्यपदे मोठ्या तयारीने गायली. त्यांचे गाणे ऐकून गावातील काही परिचितांनी प्रभाकर यांच्या वडिलांना त्यांना गाणे शिकवण्यासाठी मुंबईत पाठवण्याची सूचना केली. त्यावेळी गोव्यात पोर्तुगीज राजवट होती. महत् प्रयासाने प्रभाकर यांचे वडील त्यांना मुंबईत घेऊन आले आणि पं. सुरेश हळदणकर यांची भेट घेऊन मुलाला गाणे शिकवण्याची विनंती केली. प्रभाकर यांचा आवाज ऐकून पं. हळदकणर यांनी त्यांना आपल्या घरीच येऊन राहण्यास सांगितले. पुढची दहा वर्ष प्रभाकर कारेकर यांनी पं. हळदणकर यांच्याकडे राहून संगीताचे शिक्षण घेतले. त्यानंतर पंडित जितेंद्र अभिषेकी यांच्याकडे ९ वर्ष आणि पुढे पंडित सी. आर. व्यास यांच्याकडूनही त्यांनी शास्त्रीय गायनाचे धडे घेतले. तीन वेगवेगळ्या शैलीत गाणाऱ्या गुरूंकडून संगीताचे शिक्षण घेत, त्याला स्वत:च्या संगीत अभ्यास आणि रियाजाची जोड देत गायक म्हणून स्वत:ची वेगळी शैली विकसित केली.

- पवन देशपांडे
डोंबिवली (पूर्व)

# धन-धान्य कृषी योजना देणार कोट्यावधी शेतकऱ्यांना लाभ

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी १ फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात त्यांनी पंतप्रधान धन-धन्य कृषी योजना (पीएमडीकेवाय) सुरू करण्याची घोषणा केली. या योजनेचा फायदा देशभरातली करोडो शेतकऱ्यांना होणार आहे. देशातील एकूणच कृषी क्षेत्राची स्थिती सुधारण्यासाठी ही योजना जाहीर करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. काय आहे पंतप्रधान धन-धान्य कृषी योजना? या योजनेचे उद्दिष्ट काय? त्याचा लाभ शेतकऱ्यांना कसा होणार आणि या योजनेची अंबलबजावणी कशी केली जाणार? याविषयी जाणून घेऊ.



"आकांक्षी जिल्हा कार्यक्रम (ADP) च्या यशाने प्रेरित होऊन, आमचे सरकार राज्यांच्या भागीदारीत पंतप्रधान धन-धान्य कृषी योजना हाती घेईल," असे सीतारमण यांनी या योजनेची घोषणा करताना सांगितले होते. जानेवारी २०१८ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आकांक्षी जिल्हा कार्यक्रमाला सुरुवात केली होती. हा कार्यक्रमाचे अभिसरण (केंद्र आणि राज्य योजनांचे), सहयोग (केंद्रीय आणि राज्यस्तरीय नोडल अधिकारी व जिल्हाधिकारी) आणि स्पर्धा (जिल्ह्यांमध्ये) यांवर आधारित आहे. भारतातील सर्वांत कमी विकसित जिल्ह्यांपैकी ११२ जिल्ह्यांना लवकरात लवकर आणि प्रभावीपणे बदलणे हा त्यामागचा उद्देश आहे. या कार्यक्रमात आरोग्य आणि पोषण, शिक्षण, शेती व सिंचन, आर्थिक समावेशता, कौशल्य विकास, मूलभूत पायाभूत सुविधा या बाबींचा समावेश आहे. राज्य सरकारतर्फे या जिल्ह्यांमध्ये अनेकविध कार्यक्रम राबविले जात आहेत.

पंतप्रधान धन-धान्य कृषी योजना १०० जिल्ह्यांमध्ये राबवली जाणार आहे. ज्या जिल्ह्यांमध्ये कमी उत्पादकता आहे, त्या जिल्ह्यांचा यात समावेश करण्यात आला आहे, असे सीतारमण म्हणाल्या होत्या. सूत्रांनुसार, कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय या पॅरामीटर्सचा डेटा गोळा करत आहे, ज्याच्या आधारावर जिल्ह्यांची ओळख केली जाणार आहे. पिकाची तीव्रता ही जमीन किती कार्यक्षमतेने वापरली जाते याचे मोजमाप आहे. एकूण पीक क्षेत्र ते निव्वळ पेरणी केलेल्या क्षेत्राची टक्केवा,री अशी याची व्याख्या केली जाते. सोप्या शब्दांत पिकाची तीव्रता एका कृषी वर्षात (जुलै-जून) जमिनीच्या तुकड्यावर किती पीक घेतले जाते हे दर्शवते.

अखिल भारतीय स्तरावर, २०२१-२२ मध्ये पीक तीव्रता १५५ टक्के नोंदवली गेली. हा आकडा राज्यानुसार मोठ्या प्रमाणात बदलला. १९५०-५१ मध्ये पिकांची तीव्रता केवळ १११ टक्के होती. सूत्रांनी असेही सांगितले की, मंत्रालयाने वित्तीय सेवा विभाग आणि नाबार्डला जिल्हानिहाय कृषी कर्जाची आकडेवारी सामायिक करण्याची विनंती केली आहे

दरम्यान, पंतप्रधान धन धान्य कृषी योजनेबरोबरच अर्थमंत्री सीतारामाण यांनी अर्थसंकल्पात शेती क्षेत्रासाठी विविध योजनांची घोषणा केली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी त्यांच्या केंद्रीय अर्थसंकल्प 2025-26 च्या भाषणात डाळींमध्ये 'आत्मनिर्भरता' साध्य करण्यासाठी सहा वर्षांच्या मिशनची घोषणा केली आहे. तसेच कृषी क्षेत्र आत्मनिर्भरतेकडे नेण्यासाठी विशेष लक्ष देणारफळ भाजी उत्पादकांसाठी विशेष योजना राबवण्यात येणार आहे.

**या योजनेमुळे १.७ कोटी शेतकऱ्यांना मदत होण्याची शक्यता आहे," असे सीतारमण म्हणाल्या होत्या. अर्थसंकल्पीय कागदपत्रांमध्ये योजनेसाठी स्वतंत्र वाटप दिले गेले नाही. मात्र, अधिकारी म्हणतात की, कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय आणि मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय मंत्रालय यांद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांमधून निधी बाजूला काढला जाईल. अधिकाऱ्यांच्या मते, या योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाने औपचारिक मान्यता दिली आहे.**

**केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या भागीदारीतून पंतप्रधान धन-धान्य कृषी योजना राबविण्यात येणार आहे. १.७ कोटी शेतकऱ्यांचे उत्पन्न सुधारून आणि कृषी शाश्वतता सुधारून याचा फायदा होईल, अशी अपेक्षा आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी ही योजना राबविली जाणार आहे. या योजनेंतर्गत सध्या शेतीच्या विकासासाठी सुरू असलेल्या काही योजनांना एकत्र करून, शेतीच्या विकासावर भर दिला जाणार आहे. या योजनेद्वारे शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे. उच्च गुणवत्ता असलेले बियाणे कृषी उत्पादनात वाढवण्यासाठी खतांचा पुरवठा, तसेच ट्रॅक्टरसारखी उपकरणे घेण्याकरिताही शेतकऱ्यांना अर्थसाह्य केले जाणार आहे.**

### योजनेचे उद्दिष्ट काय?
#### अर्थमंत्र्यांच्या मतानुसार राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमाची पाच प्रमुख उद्दिष्टे

- कृषी उत्पादकता वाढवणे.
- पीक विविधीकरण आणि शाश्वत कृषी पद्धतींचा अवलंब करणे.
- पंचायत आणि ब्लॉक स्तरावर काढणीनंतरच्या साठवणुकीत वाढ करणे.
- सिंचन सुविधा सुधारणे.
- दीर्घकालीन आणि अल्पकालीन कर्जाची उपलब्धता सुलभ करणे.




## शिंगणापूर देवस्थानचा निर्णय
# शनिदेवाला ब्रँडेड तेलानेच अभिषेक !

**शनी शिंगणापूर : भेसळीच्या तेलाने श्री शनीच्या शिळेची झीज रोखण्यासाठी शनि शिंगणापूर देवस्थानने एक मार्चपासून शनिदेवाला सुट्या तेलाऐवजी भाविकांना ब्रँडेड तेलानेच अभिषेक करावा लागेल असा ठराव शनैश्वर देवस्थान विश्वस्त मंडळ न्यासच्या बैठकीत करण्यात आला. ग्रामसभेतही हा निर्णय घेण्यात आला. या आदेशाची अंमलबजावणी एक मार्चपासून होणार असल्याची अशी माहिती देवस्थानचे विश्वस्त विठ्ठल आढाव यांनी दिली. शिंगणापुरात चौथऱ्यावर जाऊन शनिदेवाच्या मूर्तीवर तैलाभिषेक करण्याची परंपरा आहे. मात्र, तेलातील भेसळीमुळं शनिदेवाच्या स्वयंभू शिळेची झीज होत असल्यानं देवस्थानकडून हा निर्णय घेण्यात आला. भाविकांनी आणलेल्या तेलाची शंका आल्यास असं तेल स्वीकारलं जाणार नाही किंवा ते तेल भारतीय अन्नसुरक्षा प्राधिकरणाकडं तपासणीसाठी पाठवलं जाणार असल्याचाही ठराव करण्यात आलाय. या ठरावाची अंमलबजावणी एक मार्चपासून होणार आहे. तर शनिशिंगणापूर देवस्थानच्या या ठरावाचं स्वागत भक्तांकडून होतानाही दिसून येत आहे.**

अहिल्यानगर : शनिशिंगणापूर येथील शनैश्वर देवस्थान विश्वस्त मंडळाने दि. १ मार्चपासून शनिदेवाची मूर्ती असलेल्या शीळेला भाविकांकडून खाद्यतेलच (ब्रँडेड) अर्पण केले जावे, असा निर्णय घेतल्याची माहिती देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष दरंदले यांनी दिली. शनिशिंगणापूरचा ग्रामसभेचा तसा ठरावही करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

शनिमूर्तीच्या शीळेला भाविकांकडून अखाद्यतेलही अर्पण केले जाते. अखाद्यतेलामध्ये विविध प्रकारची रसायने असल्याची शक्यता नाकारता येत नाही. या रसायनांमुळे मूर्तीची झीज होऊ शकते. या शक्यतेमुळे हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती श्री. दरंदले यांनी दिली.

देवस्थान विश्वस्त मंडळाने या संदर्भात परिपत्रक जारी केले असून त्याची माहिती शनिशिंगणापूर परिसरातील खाजगी व्यावसायिक, देवस्थानच्या आवारातील दुकानदार, गाळेधारक अशा सुमारे ३०० जणांना दिली आहे. देवस्थानच्या विश्वस्त मंडळांने निर्णय घेतल्यानंतर शनिशिंगणापूरच्या ग्रामसभेतही तसा ठराव करण्यात आला.

भाविकांच्या श्रद्धेनुसार २५० मिली. पासून ते ११ डब्यांपर्यंत तेल वाहिले जाते. अनेक भाविक प्लास्टिकच्या पिशवीतून सुट्टे तेलही अर्पण करण्यासाठी आणतात. हे तेल अखाद्य स्वरूपाचे असण्याची शक्यता नाकारता येत नाही, या अखाद्यतेलातील रसायनांमुळे शनिमूर्तीची संभाव्य झीज टाळण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे दरंदले यांनी सांगितले. आता शनिदेवाला तेल अर्पण करण्यासाठी सुट्टे तेल वाहू दिले जाणार नाही. खाद्य स्वरूपाचे तेलच वाहू दिले जाईल. या तेलाच्या पिशवीवर किंवा बाटलीवर ते खाद्यतेल असल्याचा उत्पादकाचा शिक्का तसेच आयएसआय मार्क पाहिला जाईल. यासाठी महाद्वारावर कर्मचारी नियुक्त केले जातील असे त्यांनी सांगितले.




पुणे शहरात गुइलेन-बॅरे सिंड्रोम (GBS) च्या वाढत्या रुग्णांशी झुंजत आहे, गेल्या तीन आठवड्यात किमान १११ रुग्ण आढळले आहेत, असे स्थानिक माध्यमांनी २८ जानेवारी रोजी वृत्त दिले. दुर्मिळ परंतु उपचार करण्यायोग्य संसर्गामुळे मृत्यू झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी २७ जानेवारी रोजी ४१ वर्षीय पुरूषाची या साथीच्या आजारामुळे पहिली मृत्यु झाली. शरीराच्या मज्जासंस्थेवर परिणाम करणारा हा विकार स्नायू कमकुवत होणे आणि श्वास घेण्यास त्रास होणे यासारखे वैशिष्ट्यपूर्ण आहे आणि अत्यंत परिस्थितीत ते पूर्णपणे अर्धांगवायू देखील होऊ शकते. तज्ञांना असा संशय आहे की हे रुग्ण दूषित पाण्यामुळे झाले असावेत. स्थानिक माध्यमांनी वृत्त दिले आहे की स्थानिक सरकारी संस्था नमुने चाचण्या आणि सर्वेक्षण करत आहेत.

गुइलेन-बॅरे सिंड्रोम हा एक दुर्मिळ न्यूरोलॉजिकल डिसऑर्डर आहे जिथे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती - जी सामान्यतः संक्रमण आणि इतर परदेशी घटकांपासून संरक्षण करते - चुकून स्वतःच्या परिधीय मज्जातंतू पेशींवर हल्ला करते. अधिक स्पष्टपणे सांगायचे तर, मायलिन आवरण - मज्जातंतू पेशींभोवती चरबी आणि प्रथिनांचा एक इन्सुलेट थर - सूजतो. मायलिन आवरण सामान्य परिस्थितीत सिग्नलला तंत्रिका मार्गांमधून भयानक वेगाने जाण्यास सक्षम करते. जर आवरणाला सूज आली असेल तर नसा उत्तेजनांचे वाहतूक करण्यास कठीण असतात. सोप्या भाषेत सांगायचे तर, या सिंड्रोम असलेल्या व्यक्तीला बोलणे, चालणे, गिळणे, मलमूत्र बाहेर काढणे किंवा शरीराची इतर सामान्य कार्ये करणे कठीण होते. ही स्थिती हळूहळू बिकट होऊ शकते. अशा प्रकारे मेंदू आणि पाठीच्या कण्यापासून बाहेर पडणाऱ्या परिधीय नसा - परिणामी खराब होतात आणि स्नायू कमकुवत किंवा अर्धांगवायू होऊ शकतात.

पहिल्या लक्षणांमध्ये शरीराच्या अंगांमध्ये मुंग्या येणे, पायांमध्ये अशक्तपणा येणे जो शरीराच्या वरच्या भागात पसरतो, चेहऱ्याच्या हालचालींमध्ये अडचण येणे, चालणे अस्थिर होणे किंवा चालण्यास असमर्थता, वेदना आणि गंभीर प्रकरणांमध्ये अर्धांगवायू यांचा समावेश होतो. इलेन-बॅरे सिंड्रोमची नेमकी कारणे अद्याप समजलेली नाहीत. तथापि, एखाद्या व्यक्तीला संसर्गजन्य रोग झाल्यानंतर तो बऱ्याचदा विकसित होतो. क्वचितच, लसीकरणामुळे तो होऊ शकतो. गुइलेन-बॅरे सिंड्रोम, किंवा जीबीएस, सायटोमेगॅलव्हायरस, एपस्टाईन बार विषाणू, झिका विषाणू आणि अगदी कोविड-१९ साथीच्या आजाराशी देखील जोडला गेला होता. असे का घडते? शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की आपली रोगप्रतिकारक शक्ती विषाणू, जीवाणू आणि बुरशी यांसारख्या परदेशी पदार्थांना ओळखण्यासाठी अत्यंत विशेषज्ञ आहे. ती अँटीबॉडीज नावाची प्रथिने तयार करते जी रोगजनकांच्या पृष्ठभागाच्या संरचनेशी बांधली जातात आणि त्यांच्या विरोधात रोगप्रतिकारक प्रतिक्रिया निर्माण करतात. गुइलेन-बॅरे सिंड्रोम सारख्या ऑटोइम्यून आजारात, आक्रमणकर्ते स्वतःला अशा पृष्ठभागाने वेढतात जे शरीराच्या स्वतःच्या संरचनेची नक्कल करते. "उदाहरणार्थ, कॅम्पिलोबॅक्टर या जीवाणूच्या पृष्ठभागाच्या रचना मायलिन आवरणासारख्या दिसतात," असे इम्यूनोलॉजिस्ट ज्युलियन झिमरमन यांनी स्पष्ट केले. म्हणून अँटीबॉडीज शरीराच्या स्वतःच्या पेशी आणि संरचनांना परदेशी शरीरे म्हणून लक्ष्य करतात आणि स्वतःला पृष्ठभागावर जोडतात. यामुळे प्रतिक्रियांचा एक प्रवाह निर्माण होतो. ऑटोइम्यून रोगांमध्ये या परस्परसंवादांचे नेमके स्वरूप अद्याप माहित नाही. कधीकधी लसीकरणामुळे जीबीएस देखील होऊ शकतो. कारण लसींमध्ये ज्या रोगजनकांपासून ते संरक्षण करतात त्यांच्यासारख्या कमकुवत किंवा निष्क्रिय रचना असतात. त्यानंतर शरीराची रोगप्रतिकारक शक्ती रोगप्रतिकारक प्रतिसाद सुरू करते.

रोग सुरू झाल्यानंतर दोन आठवड्यांपर्यंत रुग्णाची प्रकृती बिघडते. चौथ्या आठवड्यात, लक्षणे कमी होतात, त्यानंतर बरे होण्यास सुरुवात होते. बरे होण्याचा कालावधी सहा ते १२ महिन्यांपर्यंत आणि कधीकधी तीन वर्षांपर्यंत असू शकतो. सध्या, गिलेन-बॅरे सिंड्रोमवर कोणताही निश्चित इलाज नाही. अर्धांगवायू केवळ पाय आणि हातांवरच नाही तर श्वसन, रक्तदाब आणि हृदयाचे ठोके नियंत्रित करणाऱ्या मज्जासंस्थेच्या महत्त्वाच्या भागांवर देखील परिणाम करतो. हे टाळण्यासाठी, डॉक्टर रुग्णाच्या महत्वाच्या लक्षणांवर सतत लक्ष ठेवतात आणि आपत्कालीन परिस्थितीत त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवतात.

# यंदा मराठी प्रेमपटांची रेलचेल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : आजवर मनोरंजनसृष्टीत प्रेम आणि मानवी भावभावनांचा वेध घेणाऱ्या बहुसंख्य कलाकृतींची निर्मिती झाली आहे. मराठी चित्रपटसृष्टीतही प्रेमकथांवर आधारित चित्रपटांची मोठ्या प्रमाणात निर्मिती झाली असून प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. त्यामुळे प्रेमकथांवर आधारित चित्रपटांची प्रेक्षकांना नेहमीच उत्सुकता असते. या अनुषंगाने वैविध्यपूर्ण विषय हाताळणाऱ्या रूपेरी पडद्यावर २०२५ या वर्षात मराठी प्रेमपटांची रेलचेल असून वैविध्यपूर्ण प्रेमकथांवर आधारित मराठी चित्रपट झळकणार आहेत. सध्याच्या स्पर्धात्मक जगात तंत्रज्ञानाच्या आधारे विविध क्षेत्रांत झपाट्याने बदल होत असून कामाच्या पद्धतींनीही नवे स्वरूप धारण केले आहे. समाजमाध्यमांचे जाळे वेगाने पसरत असून त्यांनी युवा पिढीच्या मनाला व्यापून टाकले आहे. प्रेम व्यक्त करण्याची माध्यमे आणि स्वरूप बदललेले असले तरी प्रेमभावना पूर्वीसारखीच आहे. या पार्श्वभूमीवर मुरलेल्या प्रेमाचा गोडवा चाखवणारा सचिन मोटे लिखित आणि सचिन गोस्वामी दिग्दर्शित 'गुलकंद' हा मराठी चित्रपट १ मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'गुलकंद'च्या निमित्ताने सई ताम्हणकर आणि समीर चौघुले, प्रसाद ओक आणि ईशा डे या दोन जोड्या पहिल्यांदाच पडद्यावर पाहायला मिळतील. त्यांच्याबरोबर वनिता खरात, मंदार मांडवकर, जुई भागवत, तेजस राऊत, शार्विल आगटे यांसारखे कलाकारही या चित्रपटात आहेत.

# शरद पवारांच्या आमदाराने घेतली अजित पवारांची भेट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**गेल्या काही दिवसांपासून बीड जिल्ह्यात चांगलंच राजकारण तापलेलं पाहायला मिळत आहे. सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नेते एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत आहेत. असं असतानाच आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं. आमदार संदीप क्षीरसागर यांनी अजित पवारांची जुन्नरमध्ये येऊन भेट घेतल्याने अनेकांनी वेगवेगळे तर्कवितर्क लावल्यामुळे उलटसुलट चर्चा रंगल्या.**

### संदीप क्षीरसागर काय म्हणाले?

**"उपमुख्यमंत्री अजित पवार हे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. आमच्या बीडच्या नगरपालिकेचा विषय फार गंभीर आहे. त्यासंदर्भाने मी अजित पवार यांची भेट घेतली आहे. आजही आमची योजना तयार असताना वीज बील भरलं नाही म्हणून कनेक्शन जोडलेले नाहीत. मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध असूनही बीड शहराला १५ ते २० दिवसांनी पाणी मिळत आहे. ही अडचण मी अजित पवार यांना सांगितली आहे. तसेच या भेटीची कोणतीही गुप्तता पाळलेली नव्हती", असं स्पष्टीकरण आमदार संदीप क्षीरसागर यांनी माध्यमांशी बोलताना दिलं आहे.**

तसेच संदीप क्षीरसागरांनी जुन्नरमध्ये येऊन अजित पवारांची भेट का घेतली? याबाबत अनेकांनी प्रश्न उपस्थित केले. दरम्यान, त्यानंतर अखेर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना या भेटीबाबत स्पष्टीकरण देत भेटीचं कारण सांगितलं आहे. "मला संदीप क्षीरसागर भेटले, पण त्यांच्या बीड शहरात पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्याबाबत ते मला भेटले", असं स्पष्टीकरण अजित पवार यांनी दिलं आहे. "बीड नगरपालिकेचं वीज बील थकलेलं आहे. त्यामुळे एका जिल्ह्याच्या ठिकाणी २१ दिवसांनी पाणी पुरवठा होतो हे योग्य नाही. त्यामुळे संदीप क्षीरसागर तक्रार करत होते की यामधून काहीतरी मार्ग काढा. वीज बील थकलेलं आहे ते कनेक्शन सुरु करून त्यामधून आम्हाला मार्ग काढून द्या. त्यासाठी आमदार क्षीरसागर भेटायला आले होते. यापेक्षा दुसरे काहीही नाही. शेवटी कसं असतं की मी देखील विरोधी पक्षाचा आमदार होतो. तेव्हा माझंही काही काम असेल तर मी त्या ठिकाणच्या मंत्र्यांना जाऊन भेटत होतो. त्यामुळे यामधून दुसरा काही राजकीय अर्थ काढण्याची आवश्यकता नाही असं मला वाटतं. तसेच त्यांच्याबरोबर माझी दुसरी कोणतीही राजकीय चर्चा झालेली नाही", असं स्पष्टीकरण अजित पवार यांनी दिलं आहे.



सोमवार
१७ फेब्रुवारी २०२५

**मेष**
मनोबल वाढेल. दिवस सामान्य राहील. आव्हानांचा धैर्याने सामना कराल, आणि तुम्हाला यश मिळेल.

**वृषभ**
दिवस सामान्य असेल. करिअरशी संबंधित निवड तुम्हाला काही अडचणीत टाकू शकते

**मिथुन**
आई-वडिलांचा आशीर्वाद घेतल्याने तुमच्या सर्व अडचणी दूर होतील. आरोग्य चांगले राहील.

**कर्क**
दिवस आनंदाने भरलेला जाईल. महिलांसाठी दिवस संमिश्र आहे कामात घाई करू नका.

**सिंह**
दिवस सामान्य असेल. चढ-कमातील उतारांमुळे त्रस्त असाल, वरिष्ठांच्या मदतीने आराम मिळेल.

**कन्या**
मुलांसोबत चांगला वेळ घालवाल. दिवस अनुकूल असेल. नोकरी करणाऱ्याना बढतीची संधी मिळेल.

**तूळ**
ऑफिसात कामगिरीसाठी तुमचा सन्मान होऊ शकतो. आज तुमची नियोजित कामे वेळेवर पूर्ण होतील.

**वृश्चिक**
तुमच्या आयुष्यातील सर्व समस्या दूर होतील.कुटुंबा समवेत वेळ घालवाल. दिवस चांगला जाईल.

**धनु**
या राशीच्या महिलांसाठी दिवस खूप खास आहे. दिवसातील जास्त वेळ तुम्ही खरेदीत घालवू शकता.

**मकर**
नोकरीच्या शोधात असलेल्या लोकांना आज एखाद्या कंपनीकडून मेल येऊ शकतो. ताण घेऊ नका.

**कुम्भ**
वैवाहिक जीवनात आज गोडवा राहील. स्पर्धेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी तयारी सुरू ठेवावी.

**मीन**
शिक्षकांसाठी दिवस सामान्य असेल. आज तुमचा दिवस आत्मविश्वासाने भरलेला असेल.

# 'एनटीपीसी'मध्ये चारशे पदांची भरती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : सरकारी नोकरीच्या शोधात असणाऱ्या तरुणांसाठी आनंदाची बातमी आहे. नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेडमध्ये नोकरी करण्याची सुवर्णसंधी तुमच्याकडे आहे. या भरतीतून एकूण ४०० रिक्त जागा भरल्या जाणार आहेत. अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांनी भरतीचे परिपत्रक व्यवस्थित वाचावे. एनटीपीसीतील या भरतीसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख ०१ मार्च २०२५ आहे. इलेक्ट्रिकल किंवा मेकॅनिकल इंजिनियरिंगमध्ये बीटेक असणाऱ्या उमेदवारांना या भरतीसाठी अर्ज करता येणार आहे. १५ फेब्रुवारीपासून अर्ज प्रक्रिया सुरू झाली असून ०१ मार्च २०२५ पर्यंत अर्ज करता येणार आहे. इच्छुक उमेदवार आपले अर्ज NTPC च्या अधिकृत वेबसाइट, careers.ntpc.co.in द्वारे सबमिट करू शकतात. वयाची अट – एससी/एसटी- ०५ वर्षे सूट, ओबीसी- ०३ वर्षे सूट अर्ज करण्याची शेवटची तारीख – ०१ मार्च २०२५ पदाचे नाव: सहाय्यक कार्यकारी. एकूण रिक्त पदे: ४०० पदे. अर्ज करण्याची पद्धत: ऑनलाइन. अर्ज प्रक्रिया सुरू होण्याची तारीख: १५ फेब्रुवारी २०२५. शैक्षणिक पात्रता: इलेक्ट्रिकल/ मेकॅनिकल इंजिनीअरिंग मध्ये बी.टेक अधिकृत वेबसाईट – https://www.ntpc.co.in/

# पनवेल महापालिका हद्दीतील नागरिकांना ‘न्हावाशेवा टप्पा तीन’ मधून जादा पाणीपुरवठा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पनवेल : पनवेल महापालिका क्षेत्रातील रहिवाशांना जून महिन्यापर्यंत ‘न्हावाशेवा टप्पा तीन’ या योजनेतून जादा ५० दशलक्ष लीटर पाणीपुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या (एमजेपी) अधिकाऱ्यांनी नियोजन केले आहे. पनवेल पालिकेत नुकत्याच झालेल्या बैठकीत एमजेपीच्या अधिकाऱ्यांनी याबाबतची माहिती दिली.

एप्रिल महिन्यात न्हावाशेवा टप्पा तीन योजनेतील पाताळगंगा नदीवरील पाणी उपसा करणाऱ्या पंपहाऊसच्या उभारणीचे काम पूर्ण केले जाईल अशी माहिती एमजेपीचे उपअभियंता रमेश वायदंडे यांनी दिली. या योजनेतील निम्मे तरी पाणी तरी पनवेल पालिकेला जून महिन्यापर्यंत जादा




देण्यासाठीचे प्रयत्न सुरू असल्याचे एमजेपीने स्पष्ट केले. सध्या पनवेल महापालिका आणि सिडको वसाहतींना एमजेपीकडून १२० दश लक्ष लीटर (एमएलडी) पाण्याचा पुरवठा केला जातो. न्हावाशेवा टप्पा तीन ही योजना एकूण २२८ एमएलडी पाणी पुरवठ्यासाठी बनविण्यात आली होती. यासाठी ३५० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. ही योजना पूर्णपणे कार्यान्वित झाल्यावर पनवेल महापालिकेला १०० एमएलडी, जेएनपीएला ४० एमएलडी, सिडको मंडळाला ६९ एमएलडी आणि एमएमआरडीएला १९ एमएलडी असा पाणीपुरवठा केला जाणार आहे. या योजनेच्या कामाचे कार्यादेश संबंधित कंपनीला २०२२ ला देण्यात आले. हे काम ३० महिन्यांत पूर्ण करण्याची मुदत सरकारने दिली होती. मात्र एकाच कंत्राटदार कंपनीवर संपूर्ण प्रकल्पाची जबाबदारी दिल्यामुळे वाढलेल्या साहित्याच्या दरामुळे काम अनेक महिने ठप्प होते. त्यामुळे कामाची मुदत पुन्हा १५ महिन्यांनी वाढविण्यात आली. मात्र वाढवलेल्या मुदतीनंतरही काम पूर्ण न करु शकल्याने अजून काही महिन्यांची मुदत वाढीचा प्रस्ताव एमजेपीच्या वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात आल्याची माहिती एमजेपीचे उपअभियंता वायदंडे यांनी दिली.

या योजनेचे काम पूर्ण होण्यासाठी आणखी सहा ते आठ महिन्यांपेक्षा अधिक काळ लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे. या दरम्यान जून महिन्यापर्यंत या योजनेतून ५० एमएलडी पाणी पनवेल पालिकेला जादा मिळू शकेल यासाठी एमजेपीचे अधिकारी प्रयत्नशील आहेत. आमदार प्रशांत ठाकूर यांनी संबंधित योजनेचा आढावा घेण्यासाठी पनवेल महापालिकेत बैठक आयोजित केली होती. या बैठकीला विविध सरकारी विभागांचे अधिकारी व भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

# दुरुस्तीच्या नावाने नगरपंचायतीने खोदला राष्ट्रीय महामार्ग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर: पालघर-जव्हार-त्रंबकेश्वर-सिन्नर व घोटी या राष्ट्रीय महामार्गातील विक्रमगड शहरातून जाणारा सुमारे १२५ मीटर लांबीचा रस्ता विक्रमगड नगरपंचायतीने दुरुस्तीच्या नावाखाली उखडला असून नागरिकांनी याविषयी आक्षेप नोंदवल्यानंतर काम थांबवण्यात आले. आपल्या पूर्वपरवानगीशिवाय तसेच देखभाल दुरुस्तीचे काम अन्य यंत्रणेमार्फत राबविले जात असताना नगरपंचायतीने आरंभलेले काम बेकायदेशीर असल्याचे सांगत उखडलेला रस्ता पूर्ववत करून देण्याचे आदेश राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने दिले आहेत. पालघर-सिन्नर-घोटी या १६० अ हा राष्ट्रीय महामार्ग विक्रमगड नगरपंचायत हद्दीमधून जात असून नगरपंचायत क्षेत्रातील रस्त्याची मालकी आपली आहे असे गृहीत धरून नगरपंचायतीने आपल्या ठेकेदारामार्फत पाटीलपाडा नाक्यापासून खोदकामाला दोन दिवसांपूर्वी सुरुवात करण्यात आली. रस्त्याच्या पूर्ण भागात सुमारे दीड ते दोन मीटर खोदकाम केले जात असल्याने प्रथमतः विक्रमगड वासियांना हे काम राष्ट्रीय महामार्गाचा ठेकेदार करत असल्याची शक्यता वाटली. पहिल्या रात्री काम झाल्यानंतर राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकाऱ्यांशी स्थानिकांनी विचारणा केल्यानंतर ते काम महामार्ग प्राधिकरण करत नसल्याचे स्पष्ट झाले.

# हळदीत रिव्हॉल्व्हर ! कारवाईची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : स्वसंरक्षणासाठी शासन परवानगीने मिळालेले रिव्हॉल्व्हर सार्वजनिक ठिकाणी खुलेपणाने मिरविण्यास प्रतिबंध आहे. फक्त स्वसंरक्षणासाठीच या रिव्हॉल्व्हरचा धारकाने वापर करायचा आहे. हे शस्त्र परवानाविषयक नियम असताना कल्याणमधील उंबर्डे गावात शुक्रवारी रात्री एक व्यक्ति जवळील रिव्हॉल्व्हर काढून व्यासपीठावर गर्दीत हातात फिरवत, रिव्हॉल्व्हरचे प्रदर्शन करत हळदी समारंभात नाचत असल्याची दृश्यध्वनीचित्रफित समाज माध्यमांवर प्रसारित झाल्याने खळबळ उडाली आहे.

यापूर्वी अशाप्रकारे लग्न, वाढदिवस, हळदी समारंभ, मिरवणुकीत सार्वजनिक ठिकाणी बंदुक, रिव्हॉल्व्हर, तलवार घेऊन नाचणाऱ्यांविरुध्द पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. यापूर्वी तलवारीने केक कापण्याचे प्रकार वाढले होते. परंतु, पोलिसांनी अशा व्यक्तिंविरुध्द शस्त्र प्रतिबंध कायद्याने गुन्हे दाखल केल्याने कल्याण, डोंबिवली परिसरात मागील दोन वर्षापासून हे प्रकार थांबले होते.

ही सर्व माहिती असुनही उंबर्डे येथील हळदी समारंभात शुक्रवारी एक व्यक्तिने आपल्या कंबरेला खोचलेले स्वसंरक्षणासाठीचे रिव्हॉल्व्हर काढून ‘अरे दिवानो मुझे पेहचानो मै हु डॉन’ या हिंदी गाण्यावर नृत्य केल्याने हा चर्चेचा विषय झाला आहे.



चिंतामण लोखंडे असे सोन्याने सर्वांग मढून व्यासपीठावर नाचणाऱ्या व्यक्तिचे नाव आहे. व्यासपीठावर व्हराडी मंडळी नाचत होती. यामध्ये लहान बालके, महिला यांचाही सहभाग होता. यावेळी चिंतामण लोखंडे हेही व्यासपीठावर नाचत असताना अचानक त्यांनी उजव्या कमरेला खोचलेले स्वसंरक्षणासाठीचे रिव्हॉल्व्हर बाहेर काढले. ते डाव्या हातात गरगर फिरवत, आपल्या शस्त्राचे प्रदर्शन करत नाचू लागले. या नृत्याची उपस्थितांमधील काहींनी दृश्यध्वनीचित्रफित तयार केली. ती समाज माध्यमांवर प्रसारित केली. रिव्हॉल्व्हार घेऊन नाचत असताना काही दुर्घटना घडली असती तर त्याची जबाबदारी कोणी घेतली असती, असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. पोलीस याप्रकरणाची कशी दखल घेतात याकडे सगळयांच्या नजरा आहेत. शस्त्र परवाना नियमाचे उल्लंघन केल्याने संबंधितावर कारवाई करण्याची मागणी जाणकार नागरिकांकडून करण्यात येत आहे. कल्याण, उल्हासनगरमध्ये एकूण १९ परवानाधारी रिव्हॉल्व्हरधारक आहेत. आठ जणांनी नव्याने रिव्हॉल्व्हसाठी गृह विभागाकडे अर्ज दाखल केले असल्याचे समजते.

# नालासोपाऱ्यात चारशे इमारती जमीनदोस्त



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वसई : नालासोपारा येथील अनधिकृत इमारतींवरील कारवाई शुक्रवारी संपली. जानेवारी महिन्यापासून पालिकेने २२ दिवस कारवाई करून सर्व ४१ इमारती जमीनदोस्त केल्या. नालासोपारा पूर्वेच्या अग्रवाल नगरी येथील कचरा भूमी आणि सांडपाण्याच्या आरक्षित जागांवर ४१ अधिकृत इमारती बांधण्यात आल्या होत्या. या ४१ इमारती पाडण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. त्यानंतर पालिकेने पहिल्या टप्प्यात नोव्हेंबरमध्ये ७ दिवस कारवाई करून ७ धोकादायक इमारतींवर पाडण्यात आल्या. मध्यंतरी रहिवाशी उच्च न्यायालयात गेल्याने कारवाई थांबली होती.

दुसऱ्या टप्प्यात २३ जानेवारी पासून कारवाई सुरू करण्यात आली. यासाठी कुठलाही अनुचित प्रकार होऊ नये यासाठी पोलिसांनी मनाई आदेश लागू करण्यात आला. पोलिसांनी तब्बल ५०० पोलिसांचा बंदोबस्त ठेवला होता. सलग २२ दिवस कारवाई सुरू करण्यात आली. लोकांची समजूत काढण्यात आली. शुक्रवारी १४ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी कारवाई संपली, अशी माहिती पालिकेचे उपायुक्त दिपक सावंत यांनी दिली. या इमारतींमध्ये २ हजारांहून अधिक कुटुंबे बेघर झाली आहेत.

# सिडकोतील १२८ कर्मचाऱ्यांच्या बदल्या

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

नवी मुंबई : सिडको महामंडळातील कारभारामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी बुधवारी एकाच दिवशी सिडकोतील तब्बल १२८ अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध विभागांत बदल्या केल्या. यामध्ये शिपायापासून ते क्षेत्राधिकारी संवर्गात काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

सिडकोत कर्मचाऱ्यांची त्याच विभागातील मक्तेदारी मोडीत काढून, त्यांना विविध विभागांच्या कामाचा अनुभव मिळण्यासाठी दर तीन वर्षांनी बदल्या केल्या जातात. कार्मिक विभागाच्या व्यवस्थापक प्रमदा बिडवे यांनी केलेल्या बदल्यांची यादी बुधवारी जाहीर केली. या यादीत शिपाई, मुकादम, सफाई कामगार, सहाय्यक विकास क्षेत्राधिकारी, क्षेत्राधिकारी, लिपिक, टंकलेखक, कार्यालयीन सहाय्यक या पदांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची बदली इतर विभागांत करण्यात आली. सिडकोचे अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांना साडेबारा टक्के विभाग, वसाहत विभागातून वसाहत विभाग १, २, ३ या विभागातंच काम करण्याची संधी देण्यात आली आहे. व्यवस्थापकीय संचालक सिंघल यांनी जुनी प्रथा मोडीत काढत अनेक प्रस्थापितांना इतर विभागांत पाठविण्याचे सक्त आदेश होते. मात्र काहींचा अपवाद वगळता साडेबारा टक्के व वसाहत विभागांतच अनेकांचे पुनर्वसन करण्यात आल्याची चर्चा सिडकोत सुरू आहे.

नैना प्रकल्प, पुनर्वसन, सामाजिक सेवा, अनधिकृत बांधकाम विभाग या विभागांमध्ये ‘चिरीमिरी’ मिळत नसल्याने अनेकांनी त्यांच्या बदलीनंतर नाके मुरडली आहेत. सध्या सिडकोमध्ये कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या कामगार प्रतिनिधी निवडणुकीची प्रक्रिया सुरू असतानाच निवडणूक आचारसंहितेच्या काळात सिडकोच्या उच्चपदस्थांनी शेकडो सिडको कर्मचाऱ्यांच्या बदल्या करुन नवी प्रथा पाडली. याबाबत सिडको मंडळाच्या जनसंपर्क विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला मात्र प्रतिसाद मिळू शकला नाही.

# कोमसाप सांस्कृतिक चळवळ - प्रा. अशोक बागवे

## कोकण मराठी साहित्य परिषदेच्या कळवा शाखेची स्थापना



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कोमसाप ही सांस्कृतिक चळवळ - प्रा. अशोक बागवेकोकण मराठी साहित्य परिषदेच्या कळवा शाखेची स्थापनाठाणे तब्बल ६५पेक्षा अधिक शाखा असलेल्या कोकण मराठी साहित्य परिषदेच्या कळवा शाखेची स्थापना नुकतीच करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी प्रा. अशोक बागवे आणि कोमसापचे जिल्हा अध्यक्ष बाळ कांदळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कळवा शाखेची कार्यकारणी देखील जाहीर करण्यात आली आहे. यावेळी ज्येष्ठ कवी अशोक बागवे यांनी कोमसाप ही एक सांस्कृतिक चळवळ असल्याचे प्रतिपादन केले तर जिल्हा अध्यक्ष बाळ कांदळकर यांनी कोमसापचा साहित्यिक प्रवास यावेळी उपस्थित कार्यकारणी सदस्यांसमोर मांडला. शाखेच्या स्थापनेनंतर कळव्यात साहित्यिक चळवळीला आणखी बळ मिळेल, असा विश्वास जिल्हाध्यक्ष कांदळकर यांनी व्यक्त केला.कोकण मराठी साहित्य परिषदेची स्थापना १९९१ साली ६४व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मधु मंगेश कर्णिक यांनी रत्नागिरी या ठिकाणी केली. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, नवी मुंबई, ठाणे हे जिल्हे आणि मुंबई शहर व उपनगरे हे कोकण मराठी साहित्य परिषदेचे कार्यक्षेत्र आहे. आत्तापर्यंत कोमसापने ५१ जिल्हा साहित्यसंमेलने, ४ महिला साहित्य संमेलने आयोजित केली आहेत. ठाणे जिल्ह्यात कोमसापचा विस्तार करण्यात जिल्हा अध्यक्ष बाळ कांदळकर यांचे मोठे योगदान आहे. कोमसापच्या ६५ पेक्षा अधिक शाखा असून कळवा, मुंब्रा आणि दिवा परिसरातही साहित्यिक आणि साहित्यावर प्रेम करणाऱ्या रसिकांची संख्या मोठी असल्याने या परिसरातही कोमसापची शाखा सुरू करावी, अशी मागणी साहित्यिक आणि रसिकांची होती. त्यामुळे कळव्यातही कोमसापची कळवा शाखा नुकतीच सुरू करण्यात आली आहे. जिल्हा अध्यक्ष बाळ कांदळकर यांनीसर्वांना एकत्रित करून या कळवा शाखेची स्थापना केली आहे. यावेळी शाखेची कार्यकारणी देखील जाहीर करण्यात आली आहे. सदर नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणून निशिकांत महांकाळ यांची निवड करण्यात आली. तर कार्याध्यक्षपदी प्रा. डॉ. विलास शिंदे, कार्यवाहपदी पत्रकार प्रवीण सोनावणे आणि कोषाध्यक्षपदी सुशांत दोडके यांची निवड करण्यात आली. तर कार्यकारिणी समिती सदस्य म्हणून श्रद्धा पाटील, शमा पुजारी, विनोद बांदोडकर, राजेंद्र ठाकूर, सुनील शिरसाट, प्रतीक जाधव आणि अॅड. सुदर्शन साळवी यांची निवड करण्यातकवी, लेखकांना हक्काचे व्यासपीठयावेळी उपस्थित असलेले ज्येष्ठ कवी प्रा. अशोक बागवे यांनी कोमसाप ही सांस्कृतिक चळवळ असल्याचे प्रतिपादन करून मधू मंगेश कर्णिक यांनी साहित्य क्षेत्राला दिलेली ही मोठी देणगी असल्याचे बागवे यावेळी म्हणाले. तर जिल्हा अध्यक्ष बाळ कांदळकर यांनी कोमसापचा साहित्यिक प्रवास मांडला. मधू मंगेश कर्णिक यांनी कोकणातील साहित्यिकांना व्यासपीठ मिळावे आणि इतर संस्थांची मक्तेदारी मोडीत काढण्यासाठी कोमसापची स्थापना केली असून यामुळे अनेक कवी आणि लेखकांना हक्काचे व्यासपीठ मिळाले. कोमसाप केंद्रीय अध्यक्ष नमिता कीर कार्याध्यक्ष प्रा. डॉ. प्रदीप ढवळ, कार्यवाह माधव अंकलगे यांच्या मार्गदर्शनाखाली कोमसापची यशस्वी वाटचाल सुरू असल्याची भावना यावेळी कांदळकर यांनी व्यक्त केली.आली. ज्येष्ठ साहित्यिक सुधाकर फडके, उद्योगपती प्रमोद जगताप यांची सल्लागारपदी निवड करण्यात आली.

# पडघाच्या टी. ए. पाटील शाळेचे स्नेहसंमेलन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा दि.१६ (प्रतिनिधी) भिवंडी तालुक्यातील पडघा येथील टी. ए. पाटील इंग्लिश मिडीयम व राईज प्री स्कुलचा वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाला नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. १४ ते १५ फेब्रुवारी दरम्यान जिल्हा परिषद शाळा प्रांगणात टी. ए. इंग्लिश मिडीयम व राईज प्री स्कुलचा वार्षिक कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी नर्सरी ,ज्युनियर सिनीयर केजी १ली ते २ च्या विद्यार्थ्यांनी सामुदायिक रेकॉर्ड डान्स सादर केले तर ३ री ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी समाजप्रबोधनपर, सार्वजनिक स्वच्छता, व्यसन, सोशल मीडिया अतीवापराचे दुष्परिणाम, आमली पदार्थ सेवनाने होणारे नुकसान, महाभारतातील वस्त्रहरण, देशभक्ती, छत्रपती शिवाजी महाराजांच्या जिवनावरील दृष्य नाटक रुपात, विवीध गाणी, नाटक, सामुदायिक रेकॉर्ड नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली यावेळी विवीध क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थी, कार्यक्रमासाठी मेहनत घेणारे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक कमिटी व उपस्थित मान्यवरांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना नेते प्रकाश पाटील आमदार शांताराम मोरे उबाठा गटाचे भिवंडी लोकसभा संपर्कप्रमूख साईनाथ तारे जिल्हाप्रमुख तथा संस्थेचे अध्यक्ष कुंदन पाटील, उपाध्यक्ष शंशाक तांबोळी सचीव अवीनाश महाजन खजिनदार यशवंत गायकवाड कार्याध्यक्ष अपेक्षा महाजन संचालक सेजल तांबोळी, आश्विनी गायकवाड सरपंच रविंद्र विशे उपसरपंच निता दास ग्रामपंचायत सदस्य प्रभावती जाधव, अभिषेक नागावेकर, रश्मी तेलवणे, मयुरेश गंधे, पंचायत समिती माजी उपसभापती गुरूनाथ जाधव, माजी सरपंच अमोल बिडवी, पराग पाटोळे, राजेश जाधव, नितीन म्हात्रे अशोक गायकवाड शिवा सुतार उपस्थीत होते.

# मुरबाडमध्ये संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे आयोजन



मुरबाड-प्रतिनिधी

मुरबाड शहरातील बाजार समितीच्या प्रांगणात 13 फेब्रुवारी पासून सुरु झालेल्या अध्यात्मिक परंपरेचा मानदंड असलेला धर्म महोत्सव म्हणजेच ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात झाली असून या वर्षी अनेक नावाजलेले व प्रज्ञावंत समाजप्रबोधकारांचे किर्तन व प्रवचन श्रवणाचा लाभ भाविकांना मिळत आहे.सुरुवाती पासूनच यावर्षी हजारो श्रोत्यांची उपस्थिती श्रवणाला पाहायला मिळत आहे.

बिडचे भाषाप्रभू अमृतस्वामी महाराजांनी आपल्या अमृत वाणीने उपस्थित श्रोत्यांना मंत्र मुग्ध करत वारकरी संप्रदायाचे सध्या होत असलेले बाजारीकरणावर आपल्या खास शैलीत समाचार घेतला.तर ज्ञानेश्वर महाराज काकडे यांनी ज्ञानोबा , तुकोबा, एकनाथ,नामदेवा सारख्या महान संताचे महाराष्ट्रावर मोठे उपकार आहेत याचे स्मरण करून दिले.या सप्ताहाला भाविकांचा भरभरून प्रतिसाद मिळत आहे. किर्तनाला तालुक्यातील प्रसिद्ध मृदंग वादक सुधीर कराळे व नितीन चौधरी यांच्या सुरेख वादनाची व गायकांची साथ लाभत आहे. ज्यांच्या मार्गदर्शनाखाली हा सप्ताह चालतो ते महंत प्रमोद महाराज जगताप यांनी मुरबाड करांचे कौतुक केले असून या धर्म महोत्सवाच्या कार्यात प्रत्येकाचा हातभार लागला पाहिजे असे आवाहन करताना यावर्षी हिंदवी स्वराज्य संस्थापक राजे शिवछत्रपतींची जयंती 19 फेब्रुवारीला म्हणजे पालखी मिरवणूक सोहळयाच्या दिवशी येत असल्याने सदर मिरवणूक सोहळा त्याच दिवशी सकाळी 10 वा. आयोजित करण्यात आला असून 20 तारखेला काळा होणार असल्याचे सांगत सर्वांना कळविण्याचे आवाहन केले आहे.या सप्ताहासाठी लक्ष्मण सरनिंगे, शांताराम (आण्णा) बांगर व त्यांचे सर्व सहकारी विशेष मेहनत घेत आहेत.

# पुलवामा हल्ल्यातील शहीदांना ठाण्यात श्रद्धांजली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : प्रतिनिधीजगभरात 14 फेब्रुवारी हा दिवस 'व्हेलेंटाईन डे' म्हणून साजरा केला जात असताना भारताच्या इतिहासात या दिवसाची नोंद काळा दिवस म्हणून आहे. 14 फेब्रुवारी 2019 रोजी भारतीय जवानांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला होता. पुलवामा हल्ल्यात CRPF चे 40 जवान शहीद झाले होते. आज पुलवामा हल्ल्याला सहा वर्षे पूर्ण झाली असून देशभर शहीदांना श्रद्धांजली वाहिली जात आहे. इंदिरानगर नाका, वागळे इस्टेट, ठाणे येथे आदर्श डिफेन्स ट्रेनिंग अकॅडमी व आदर्श स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने सिद्धार्थ गणपत कांबळे यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक 14 फेब्रुवारी 2025 रोजी सायंकाळी 6.00 वाजता श्रद्धांजली वाहण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राजकिय, धार्मिक, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी शहिदांना श्रद्धांजली वाहिली. त्याचबरोबर घोषणा देत जवानांवर केलेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध करण्यात आल माजी नगरसेवक, विभाग प्रमुख एकनाथ भोईर, माजी परिवहन सदस्य दशरथ यादव, संजय झा, एज्युकेशन क्लासेसचे संचालक रविन्द्र प्रजापति, हज कमेटीचे सदस्य बबलु शेख, आजाद समाज पार्टीचे ठाणे शहर युवा अध्यक्ष सन्नी जगताप, विभाग प्रमुख राजीव शिरोडकर, वंजित आघाडीचे सुनिल कांबळे, अमोल शिंदे, सुरेश पवार, करन चांदे, अमोल कांबळे सह आदर्श डिफेन्स ट्रेनिंग अकॅडमीचे सर्व पदाधिकारी व परिसरातील मान्यवर उपस्थित होते.

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता
ठाणे ■ सोमवार ■ 17 फेब्रुवारी 2025
jeevandeepvartanews2020@gmail.com



# ‘लव्ह जिहाद’ कायद्याला विरोध - रामदास आठवले



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राहाता : ‘लव्ह जिहाद’ कायद्याला माझा विरोध आहे. हिंदू-मुस्लिम मुले-मुली एकत्र आले, की त्यास असे म्हणणे योग्य नाही. दलित-सवर्णसुद्धा एकत्र येतात. मुले-मुली एकत्र येतात, अशी लग्न होतात. हिंदू- मुस्लिम लग्न झाले, की त्याला ‘लव्ह जिहाद’ म्हणणे चुकीचे आहे. मी याला सहमत नाही. परंतु धर्मांतर होऊ नये म्हणून कायद्यात तरतूद असावी, असे स्पष्ट मत केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांनी आज, शनिवारी शिर्डीत माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

जातीय सलोख्याबाबत बोलताना आठवले म्हणाले, ‘जातीय सलोखा न बिघडवता योग्य भूमिका असावी. मोदी सर्वांना समान मानतात. त्यांनी सर्वांसाठी योजना आणल्या. त्याचा मुस्लिम समाजालाही फायदा होतो. मोदी सरकार अतिरेकी मुस्लिमांच्या विरोधात आहे. मुस्लिम समाजाच्या विरोधात नाहीत. मुलाने हिंदू धर्म स्वीकारावा अशीही तरतूद असावी. मी ह्य प्रॅक्टिकलह्मधून गेलोय. मुले, मुली एकत्र आले आणि सहमतीने लग्न झाले, तर त्यात वावग काय, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# उद्याची तिसरी मुंबई कल्याण डोंबिवली परिसर !- खा. श्रीकांत शिंदे

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



कल्याण : आधी मुंबई मग त्यानंतर नवी मुंबईप्रमाणे आता तिसरी मुंबई जर कुठे होणार असेल तर कल्याण डोंबिवलीत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करत त्यादृष्टीने अधिकाधिक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी आपण काम करत असल्याची माहिती कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिली आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघातील कल्याण ग्रामीण विधानसभेच्या माणगाव तलाव सुशोभीकरणाच्या भूमीपूजन समारंभात ते बोलत होते.

गुलाब वझे आणि दत्ता वझे यांच्या मागणीनुसार सुमारे ५ कोटी रुपयांच्या निधीतून माणगाव तलावाचे नूतनीकरण आणि आसपासच्या परिसराचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. तलावाच्या सुशोभीकरण प्रकल्पानंतर नागरिकांना आपल्या कुटुंबासमवेत उत्तम वेळ घालवण्यासाठी एक चांगले ठिकाण शहरातच उपलब्ध होणार आहे. निळजे तलावाचे सुशोभीकरणाचे काम देखील सुरू असून या कामाचीही यावेळी शिंदे यांनी पाहणी केली. प्रकल्पाचे काम उत्तम दर्जाचे व्हावे, यासाठी संबंधितांना सूचनाही केल्या.

खिडकाळी शिवमंदिर परिसराच्या सुशोभिकरण प्रकल्पाचे काम सुरु आहे. सुमारे १० कोटी रुपयांच्या निधीच्या माध्यमातुन हे काम पूर्णत्वास जात आहे. खिडकाळी येथील शिवलिंग स्वयंभू असून मंदिराला देखील प्राचीन इतिहास आहे. याच पार्श्वभूमीवर मंदिर परिसराचे पारंपरिक पद्धतीने सुशोभीकरण, घाट आणि आरतीसाठी जागा, भक्तांसाठी दर्शनाची सुविधा, मंदिर परिसरातील तलावाचे पुनरुज्जीवन यांसारखी विविध कामे सुरु आहे. या ठिकाणी असलेल्या तलावात बोटिंग सुविधा, जॉगिंग ट्रॅक यांसारख्या अनेक सुविधा उभारण्यात येत आहे. या प्रकल्पाची खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांनी पाहणी करून काम दर्जेदार आणि भाविकांना दर्शनासाठी कुठलीही गैरसोय होणार नाही या दृष्टीने करण्याच्या सूचना यावेळी सर्व पालिका अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी मंदिरात जाऊन भगवान शंकराचे दर्शन ही घेतले. यावेळी शिवसेनेचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कल्याण डोंबिवली महापालिकेतील विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

तर बदलापूरपासून ते थेट नवी मुंबई एअरपोर्टपर्यंत ॲक्सेस कंट्रोल मार्ग बांधण्यात येत असून तो कल्याण लोकसभेतील कळवा, मुंब्रा, दिवा, डोंबिवली, कल्याण ग्रामीण, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर असा समांतर पद्धतीने उभारण्यात येणार आहे. जेणेकरून या मार्गावर राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला शहराबाहेर जायचे असल्यास अवघ्या 15 मिनिटांमध्ये बाहेर पडता येणार आहे. भविष्यामध्ये नवी मुंबई एअरपोर्ट हेच सध्याच्या मुंबई एअरपोर्टप्रमाणे पूर्ण क्षमतेने कार्यरत होणार असल्याने कल्याण डोंबिवली परिसर हा तिसरी मुंबई नावारूपाला येणार असल्याचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केले.

या कल्याण लोकसभा मतदारसंघात एकीकडे मेट्रोचे काम सुरू असून नागरिकांना काही काळ त्याचा त्रास सहन करावा लागणार आहे. एकदा ही मेट्रो सुरू झाली की वाहतूक कोंडीचा त्रास संपून अगदी सहजपणे ठाणे, मुंबई किंवा नवी मुंबईच्या दिशेने आपण जाऊ शकतो. गेल्या अडीच वर्षांमध्ये राज्य शासनाने इथला 27 गावांच्या मालमत्ता कराचा प्रश्न असो, 27 गावांतील कर्मचाऱ्यांचा प्रश्न असो की 1960 पासून रखडलेल्या मोबदल्याचा, संत सावळराम महाराज स्मारक, आगरी कोळी भवन हे सर्व प्रश्न अत्यंत कमी वेळेमध्ये सोडवून आपल्याला दिलासा दिल्याचे खा. डॉ. शिंदे यांनी यावेळी सांगितले.

# म्हसा विद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम!

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

मुरबाड दि.१७ -मुरबाड तालुक्यातील वीर हुतात्मा भाई कोतवाल विद्यालय,म्हसा येथे विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये "विद्यार्थी आनंदी दिवस" हा कार्यक्रम घेण्यात आला.हौशी विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या पाककृती तयार करुन शाळेच्या आवारातच विक्रीस ठेवल्या होत्या . विद्यार्थी ग्राहकांनी मोठ्या प्रमाणावर खाद्य पदार्थांची खरेदी केली.सांस्कृतिक विभाग प्रमुख विद्या बैरागी यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. क्रीडा शिक्षक भानुदास लोहार यांच्या नियोजनानुसार "पारितोषिक वितरण समारंभ " आयोजित करण्यात आला. ज्येष्ठ लेखक तथा दिग्दर्शक प्रा अनिल कवठेकर व कान्होळ गावचे सरपंच बाळा घरत, प्रा डॉ चंद्रमणी मोहिते यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. विज्ञान शिक्षक महेंद्र बेंद्रे व धनश्री साबळे यांच्या नियोजनानुसार विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन घेण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सचिव किसन चौधरी, संचालक स्नेहल शहा आणि ग्रामस्थ बंधू उपस्थित होते.स्नेहसंमेलन म्हटले म्हणजे तेथे महाराष्ट्राची लावणी आलीच.हिंदी,मराठी लोकनृत्य,कोळीगीत,लोकगीत, नाटक, पथनाट्य,सोलो नृत्य,समूह नृत्य आदि प्रकारांचे सादरीकरण करण्यात आले. तसेच इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांचा"निरोप समारंभ" घेण्यात आला.या प्रसंगी नाट्य कलावंत व मुरबाडचे उपमुख्याध्यापक आनंद जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते .जीवनातील टर्निंग पॉइंट म्हणजे माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा होय.त्याला आनंदात, मोठ्या जिद्दीने, प्रयत्नपूर्वक सामोरे गेले पाहिजे. या उज्वल यशामुळेच आपण भावी जीवनात मोठे होत असतो.असे विचार जाधव यांनी व्यक्त केले. या प्रसंगी डॉ मोहिते,जगन्नाथ कथोरे,सुनिल रेंघे,राहुल प्रधान,भानूदास घागस,सचिन डामसे,मिनाक्षी गोडांबे, सारीका कडाळी,पूजा कुर्ले, रमा पष्टे उपस्थित होते. शेवटी कार्यक्रमाची सांगता 'वंदे मातरम' गीताने करण्यात आली.

# ओबीसी प्रवर्गातून राहुल निमसे राज्यात प्रथम!

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

मुरबाड दि१६- शहापूर तालुक्यातील उंबरखांड गावातील सुपुत्र राहुल केशव निमसे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) परीक्षेत घवघवीत यश मिळवत ओबीसी प्रवर्गातून राज्यात प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. नुकताच म्हणजे ११ फेब्रुवारी रोजी या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, त्यात राहुलने आपल्या अथक मेहनतीच्या जोरावर सु यश संपादन केले आहे. राहुलचे वडील केशव निमसे हे गेल्या २६ वर्षापासून रिक्षा चालविण्याचा व्यवसाय करत असून रात्रंदिवस मेहनत करून त्यांनी अंत्यत हालखीच्या परिस्थितीत मुलांना शिक्षण व चांगले संस्कार दिले मुलाच्या शिक्षणासाठी पैसे पुरविले.राहुलने सतत १४ ते १६ तास अभ्यास करून आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित केले. कठीण परिश्रम, योग्य अभ्यास पद्धती आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी हा यशाचा टप्पा गाठला. त्याने अनेक अडचणींवर मात केली, मात्र कधीही हार मानली नाही. त्यांनी अभ्यासाच्या प्रत्येक टप्प्यावर आत्मसंयम आणि सातत्य ठेवत आपली तयारी मजबूत केली. ,(MPSC) परीक्षेसाठी आवश्यक असलेला सखोल अभ्यास, सराव चाचण्या आणि स्मार्ट स्टडी प्लॅन यांचा योग्य समन्वय साधून त्यांनी आपले ध्येय गाठले.राहुल निमसे यांच्या या ऐतिहासिक यशामुळे शहापूर तालुक्यात तसेच त्यांच्या गावी उंबरखांड मध्ये आनंद व्यक्त होत असुन विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भेट देऊन राहुलचे कौतुक केले आहे.शहापूर तालुक्यातील सहा विद्यार्थ्यांनी चांगले यश संपादक केल्याने राहुल सह सर्वच विद्यार्थ्यांचे तालुक्यात कौतुक होत

## आखिल भारतीय साहित्य परिषद नव लेखक शोध स्पर्धेत
# जीवनदीप महाविद्यालय प्रथम क्रमांकवर



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

दि. १६ फेब्रुवारी २०२४ रोजी बी.के.बिर्ला महाविद्यालय येथे आखिल भारतीय साहित्य परिषद आणि बिर्ला महाविद्यालय आयोजित ' नव लेखक शोध कहाणी प्रतियोगिता २०२४' स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. यात सलग दुसऱ्यांदा जीवनदीप महाविद्यालयाच्या मराठी विभागाने प्रथम व्दितीय क्रमांक पटकावला. प्रथम क्रमांक - कु. पुर्वा थेरे व द्वितीय क्रमांक - कु. धनश्री कोर यांचे संस्थेचे अध्यक्ष श्री.रविन्द्र घोडविंदे सर, संचालक श्री. प्रशांत घोडविंदे सर प्राचार्य डॉ.के.बी.कोरे सर, उप प्राचार्य व मराठी विभाग प्रमुख प्रा.हरेंद्र सोष्टे सर यांनी अभिनंदन केले. यासाठी विद्यार्थ्यांना मराठी विभाग प्रमुख प्रा.हरेंद्र सोष्टे सर व सहाय्यक प्राध्यापक महेश थोरात सर यांचे विशेष मार्गदर्शन मिळाले.

# सिगारेट – बिडीच्या विक्रीवर आरोग्य विभागाचे निर्बंध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



मुंबई : महाराष्ट्रात जेव्हा करोना वेगाने पसरत होता तेव्हा आरोग्य विभागाने राज्यातील कोणत्याही पान बिडी दुकानात सुट्टी सिगारेट व बिडी विकायला बंदी घातली होती. त्यानंतर राज्यात काही साथरोग आले.आता जीबीएसने धुमाखूळ घातला आहे मात्र आरोग्यविभागाच्या या आदेशाची असून पोलीस व महापालिका व खुद्द आरोग्य विभागाकडूनच कोणतीही अंमलबजावणी होताना दिसत नाही. महाराष्ट्रात शाळा – कॉलेजमधील तरुणाई मोठ्या प्रमाणात तंबाखूजन्य पदार्थ म्हणजे सिगारेट पासून गुटख्याच्या अहारी गेले आहे. वेळोवेळी राज्यातील अनेक सरकारांनी दारुबंदी, सिगारेट तसेच तंबाखूजन्य पदार्थांच्या प्रसारावर नियंत्रण आणण्यासाठी अनेकदा बैठका घेतल्या आहेत. आरोग्य विभागाने यापूर्वी सुट्टी सिगारेट व बिडीची विक्री होऊ नये यासाठी विधी व कायदा विभागासह सरकारकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता. मात्र विधी विभागाकडून पुरेसे पाठबळ न मिळाल्याने आरोग्य विभागाला याबाबत आदेश काढता आला नव्हता, असे आरोग्य विभागाच्या एका वरिष्ठ अधिकार्याने सांगितले.दरम्यानच्या युती शासनाच्या काळात शाळी-महाविद्यालये तसेच रुग्णालये व धार्मिक स्थळांच्या शंभर मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर बंदी लागू करण्यात आली. मात्र त्याचीही ठोस अंमलबजावणी आजपर्यंत कोणताही संबंधित विभागाने केलेली नाही. यातील सर्वात महत्वाचे म्हणजे याबाबतच्या केंद्राच्या कायद्याचे पालन महाराष्ट्रात कायदा अस्तित्वात आल्यापासून कधीच करण्यात आले नाही.

‘सिगारेट आणि अन्य तंबाखूजन्य उत्पादन कायदा २००३’ ( जाहिरात, प्रतिबंध आणि व्यापार, वाणिज्य, उत्पादन, पुरवठा आणि वितरण विनियमन) या अंतर्गत सिगारेट किंवा तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करतेवेळी पाकिटाच्या ८५ टक्के भागावर सिगारेट वा बिडी आरोग्याला घातक असल्याचा संदेश स्पष्ट शब्दात छापणे बंधनकारक आहे. सिगारेट पाकिट अथवा बीडी बंडलाची विक्री केल्यास कायद्यात अपेक्षित असलेला उद्देश म्हणजे ‘आरोग्याच्या धोक्याची कल्पना’ हा साध्य होतो. मात्र तेच सुट्टी म्हणजे सिगारेटच्या पाकिटातून एकेक सिगारेट काढून विकल्यास ग्राहकाला धोक्याची कल्पना कायद्याच्या अर्थाप्रमाणे मिळत नाही.

# महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाच्या प्रदर्शनाला कुंभ मेळ्यातील भाविकांची भेट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

प्रयागराज - महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाकडून कुंभक्षेत्री सेक्टर ७ येथे प्रदर्शनकक्ष लावण्यात आला आहे. या प्रदर्शन कक्षाला प्रचंड प्रतिसाद मिळत असून ११ फेब्रुवारीपर्यंत १० हजारांहून अधिक भाविकांनी कक्षाला भेट दिली. साधू-संतांसह वैद्यक, शिक्षण, विज्ञान, प्रशासन आदी क्षेत्रांत कार्य करणाऱ्या उच्चपदस्थ मान्यवरांनी महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाच्या कार्याचे कौतुक केले. या प्रसंगी ‘इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स’चे के.के. सिंह, ‘इस्रो’च्या निवृत्त वैज्ञानिक डॉ. नलिनी सतीश, उत्तर-मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक शरत चंद्रायन् यांच्यासह अनेक मान्यवरांनी संपूर्ण प्रदर्शन पाहिले आणि उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ‘ र ाष्ट्रीय विद्यार्थी सेने’चा भाग असलेल्या उत्तर प्रदेशमधील ‘भारत स्काऊट अँड गाईड’च्या विद्यार्थ्यांनी महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाकडून देण्यात येणाऱ्या ‘व्यक्तीमत्त्व विकास आणि तणाव नियंत्रण’, या विषयावरील मार्गदर्शनाचा लाभ घेला. उत्तरप्रदेश, हरियाणा, राजस्थान, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, उत्तरांचल अशा अनेक राज्यांतून, तसेच न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, युरोप अशा अनेक देशांतून आलेल्या भाविकांनीही अध्यात्मविषयीच्या वैज्ञानिक परीक्षणांविषयीची माहिती जिज्ञासेने जाणून घेतली. या प्रदर्शनात दिली जाणारी अध्यात्मशास्त्रीय माहिती आणि वैज्ञानिक आधार लोकांना भावला. अनेक भाविकांनी महर्षि अध्यात्म विश्वविद्यालच्या कार्याशी जोडण्याची इच्छा व्यक्त केली.

# कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे जखमी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

अंबरनाथ: कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश मोरे एका अपघातात तोल गेल्याने गटारात पडले. यात ते जखमी झाले असून त्यांच्या हाताला दुखापत झाली आहे. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

शनिवारी कल्याण लोकसभा मतदारसंघात विविध विकासकामांची पाहणी करण्यासाठी खासदार डॉ श्रीकांत शिंदे अंबरनाथ शहरात होते. अंबरनाथ शहरात क्रीडा संकुल, नाट्यगृह, शाळा आणि शिवमंदिर सुशोभीकरण प्रकल्पाच्या कामाची पाहणी यावेळी करण्यात आली. त्यावेळी अंबरनाथ पश्चिमेतील क्रीडा संकुलाच्या कामाची पाहणी केल्यानंतर आमदार राजेश मोरे सर्वसमावेत निघत होते. त्यावेळी एक गटार ओलांडताना राजेश मोरे यांचा तोल गेला. तोल गेल्याने मोरे हे लहानशा गटारात पडले. त्यामुळे त्यांच्या हाताला दुखापत झाली असल्याची माहिती आहे. त्यांना सुरुवातीला डोंबिवली आणि नंतर मुंबईच्या खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघात राजेश मोरे शिवसेना शिंदे गटाचे आमदार आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तत्कालीन एकमेव आमदार राजू पाटील यांचा त्यांनी पराभव केला होता.

राज्यात २०२४ विधानसभा निवडणुकीत राजू पाटील यांची जागा निवडून येणार अशी सर्वांना खात्री होती. मात्र खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांनी इथे स्वतः प्रचाराची सूत्रे हाती घेत विजय खेचून आणला असे बोलले जाते. त्यामुळे राजेश मोरे जायंट किलर ठरले होते. मोरे यापूर्वी कल्याण डोंबिवली महापालिकेत नगरसेवक होते.

## अखिल भारतीय मराठा महासंघाचा
# शाहीर शाहिद खेरटकर यांना ‘मराठा भूषण‘ पुरस्कार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



अखिल भारतीय मराठा महासंघातर्फे शाहीर शाहिद खेरटकर यांचा "मराठा भूषण" पुरस्कार देऊन गौरवसद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्रचार्य महाराज दक्षिणपीठ नाणीज यांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान....कोकण - ( दिपक कारकर ) आपल्या अंगीकृत असंख्य कलागुणांनी गेली २५ वर्षे उत्कृष्ट,बहारदार शाहीरीच्या माध्यमातून रसिक मनाला तृप्त करण्याचे कार्य शाहीर शाहिद खेरटकर करत आले आहेत.त्यांच्या शाहिरीचे वैशिष्ट्य म्हणजे जात,धर्म,पंथ,वर्ण यापलीकडे जाऊन मानवतावाद प्रस्थापित करण्यासाठी त्यांची लेखणी सरसावते आणि त्यांच्या पहाडी आवाजातून लोकांचे प्रबोधन होते.शाहिद खेरटकर यांनी कोकणची लोककला जाखडी (शक्ती - तुरा)मनापासून जोपासली आणि तेच रसिकांचे मनोरंजन आणि प्रबोधन करण्याचे त्यांचे उत्तम साधन बनले.शाहीर स्वतः एक उत्तम कवी,गायक,वक्ते,निवेदक आणि पत्रकार अशा विविध भूमिकेतून समाजात वावरताना दिसतात.साहित्य क्षेत्रात देखील त्यांनी मजल मारली आहे,त्यांचा प्रकाशित झालेला "ललकारी" हा कविता संग्रह देखील वाचकांच्या पसंतीस उतरला आहे.कोकणातील ह्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाची दखल घेऊन नुकताच अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने शाहीर शाहिद खेरटकर यांना जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज दक्षिणपीठ नाणीज यांच्या शुभहस्ते हस्ते "मराठा भूषण" पुरस्कार प्रदान करण्यात आला.याप्रसंगी आमदार भास्कर शेठ जाधव,आमदार शेखर निकम,माजी आमदार सदानंद चव्हाण,अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिलीपदादा जगताप,राष्ट्रीय महिला अध्यक्ष सौ. स्वाती ताई काशिद,राष्ट्रीय कीर्तनकार ह भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाभळे अखिल भारतीय मराठा महासंघाचे रत्नागिरी जिल्हाध्यक्ष संदीप सावंत यांच्यासहित समस्त नागरिक, श्रोतेजण उपस्थित होते. अखिल भारतीय मराठा महासंघ १२५ वर्षे पूर्ण करत आहे,त्याच पार्श्वभूमीवर राज्यात अशाप्रकारे धार्मिक व सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत.याचाच एक भाग म्हणून दोन दिवसीय कीर्तन महोत्सव आयोजित करण्यात आला होता,यानिमित्ताने बहुजन समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करणाऱ्या गुणवंतांचा "मराठा भूषण" पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला."मराठा ही जात नव्हे तर एक विचार आहे".या विचारधारेने चालणारे संघटन म्हणजे अखिल भारतीय मराठा महासंघ होय.

या दोन दिवसीय भव्य कीर्तन महोत्सवाचे सूत्रसंचालन देखील शाहीर शाहिद खेरटकर यांनी केले.चिपळूणकर भूमिपुत्र शाहीद खेरटकर यांना प्राप्त झालेल्या पुरस्कार बद्दल त्यांचे अनेक स्तरातून अभिनंदनासह कौतुक होत आहे.

# बिर्ला महाविद्यालयात हवामान बदल जनजागृती चर्चासत्र

दै. ठाणे जीवनदीप वार्ता




कल्याण : हवामान बदल आणि त्याचा समाजावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी तांत्रिक हस्तक्षेप या विषयावर कल्याणच्या बी. के. बिर्ला महाविद्यालयात चर्चासत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्सेस इंडिया, मुंबई चॅप्टर (नासी-एमसी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचा उद्देश विशेषत: कल्याणच्या ग्रामीण आणि आदिवासी भागात जैवविविधता, हवामान बदल आणि शाश्वत पर्यावरण संवर्धन धोरणांविषयी जनजागृती करणे हा होता.

परिसंवादाची सुरुवात मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन सत्राने झाली. प्रमुख पाहुणे कल्याणयेथील बी. के. बिर्ला महाविद्यालयाचे उपाध्यक्ष सुबोध दवे यांनी उपस्थितांना संबोधित करताना हवामान विषयक कृतीचे महत्त्व अधोरेखित केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश पाटील यांनी निमंत्रित पाहुण्यांचे स्वागत व तर बीकेबीसीकेचे संचालक व नासीचे सदस्य डॉ. नरेश चंद्रा यांनी अध्यक्षीय भाषण केले. नासी मुंबई चॅप्टरचे अध्यक्ष प्रा.ए.के.सिंग यांनी नॅशनल अ◌ॅकॅडमी ऑफ सायन्सेस, इंडियाच्या विविध कार्यक्रमांची माहिती दिली.

या कार्यक्रमात मान्यवर तज्ज्ञांनी अभ्यासपूर्ण सादरीकरण केले. आयआयटी मुंबईच्या सेंटर फॉर क्लायमेट स्टडीजचे प्रा.रघु मुर्तुगुड्डे यांनी भारतातील हवामान बदलाची आव्हाने या विषयावर मनोरंजक भाषण केले. स्प्राउट्स, मुंबईचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि संस्थापक डॉ. आनंद पेंढारकर यांनी कल्याण परिसरातील वनस्पती आणि प्राण्यांच्या किनारपट्टीवरील विविधतेवर चर्चा केली आणि किनारपट्टीच्या परिसंस्थांचे पर्यावरणीय महत्त्व अधोरेखित केले. हेमंत कारखानीस यांनी मुंबई आणि कल्याणमध्ये खारफुटी संवर्धनासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. दुपारच्या सत्रात बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे (बीएनएचएस) उपसंचालक डॉ. राहुल खोत उपस्थित होते. शाश्वत विकास उद्दिष्टे (एसडीजी) या विषयावरील त्यांच्या भाषणात हवामानविषयक धोरणांचा विकास उपक्रमांमध्ये समावेश करण्यावर भर देण्यात आला.

सिंग (आयआयटी मुंबई), प्रा. पी. ए. हसन (शास्त्रज्ञ, बीएआरसी), प्रा. के. पी. मिश्रा (माजी शास्त्रज्ञ, बीएआरसी) आणि प्रा. मनिंदर कौर (उपप्राचार्य, बीकेबीसीके) यांच्यासह मान्यवर शिक्षणतज्ज्ञ उपस्थित होते.

हवामान बदल आणि जैवविविधतेचा ऱ्हास यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी उत्सुक अभ्यासक, संशोधक, विद्यार्थी आणि पर्यावरणप्रेमी या चर्चासत्रात सहभागी झाले होते. आयटी बिल्डिंगच्या सेमिनार हॉलमध्ये झालेल्या या कार्यक्रमामुळे संवर्धनाची रणनीती आणि शाश्वत पद्धतींवरील चर्चेसाठी एक मौल्यवान व्यासपीठ उपलब्ध झाले.

समन्वयक डॉ. महेंद्र खांडपेकर व डॉ. संदेश जायभाये यांनी उत्स्फूर्त सहभागाबद्दल वक्ते व उपस्थितांचे आभार मानले. या चर्चासत्राने पर्यावरणीय जबाबदारी वाढविणे आणि या क्षेत्रातील शाश्वत पद्धतींना प्रोत्साहन देण्याच्या दिशेने एक महत्वपूर्ण पाऊल उचलले. बी. के. बिर्ला कॉलेज आणि आसपासच्या संस्थांमधील सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी या चर्चासत्रात सक्रीय सहभाग घेतला.

‘ठाणे जीवनदीप वार्ता’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com